क्रमांक : १८९९८/ ई-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
दिनांक : ऑक्टोबर, २०२६
23 OCT 2026

:: परिपत्रक ::

विषय : महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२६ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराकरिता नेमून देण्यात आलेल्या दिनांकांबाबतचे विवरणपत्र.

संदर्भ : या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक १६१७७/ ई-१, दिनांक २ नोव्हेंबर, २०२३.

महाराष्ट्र विधानपरिषदेचे सन २०२६ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२६ रोजीपासून विधान भवन, नागपूर येथे सुरु होणार आहे. सोमवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२६ ते शुक्रवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२६ या कालावधीतील तारांकित प्रश्नोत्तरावरील कार्यवाही बाबतची माहिती दर्शविणारे विवरणपत्र (मागील पृष्ठावर छापल्याप्रमाणे) आपल्या माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत असून या सचिवालयाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन देण्यात येत आहे. **त्याअनुषंगाने मंत्रालयीन विभागांना खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सुचित करण्यात येत आहे :-**

(१) महाराष्ट्र विधानपरिषद तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी मा.मंत्री महोदयांना नेमून देण्यात आलेले दिनांक विवरणपत्राच्या स्तंभ (३) मध्ये व मंत्रालयीन विभागास नेमून देण्यात आलेले दिनांक विवरणपत्राच्या स्तंभ (४) मध्ये दर्शविण्यात आले आहेत.

(२) या सचिवालयाच्या संदर्भाधीन परिपत्रकान्वये सर्व मंत्रालयीन विभागांना कळविल्यानुसार तारांकित प्रश्नांची उत्तरे केवळ QIS या वेब ॲप संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीनेच विहित मुदतीत या सचिवालयाकडे पाठविण्यात यावीत.

(३) ज्या विभागास तारांकित प्रश्न चिन्हांकित करण्यात आला आहे, त्या विभागास असा प्रश्न अन्य विभागास हस्तांतरित करावयाचा असल्यास, विवरणपत्राच्या स्तंभ (५) मध्ये प्रश्नांच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा अंतिम दिनांक दर्शविण्यात आलेला आहे. उक्त दिनांकानंतर प्रश्न सूचनांच्या हस्तांतरणाची प्रकरणे या सचिवालयास प्राप्त झाल्यास तारांकित स्वीकृत प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक/गट बदलून देता येणे शक्य होणार नाही. अशा स्थितीत त्या प्रश्नाच्या उत्तरासाठी नेमून दिलेल्या दिनांकास उत्तर प्राप्त होणे आवश्यक राहील तसेच संबंधित मा.मंत्री महोदयांना सदर तारांकित स्वीकृत प्रश्नाच्या उत्तराकरिता निश्चित केलेल्या मूळ दिवशीच सभागृहात उपस्थित राहून अनुपूरक प्रश्नांना उत्तरे द्यावी लागतील.

..२/-

तसेच तारांकित स्वीकृत प्रश्न अन्य विभागाकडे हस्तांतरीत होत असल्यास, विवरणपत्रात दर्शविण्यात आलेल्या तारांकित प्रश्नाच्या ऑनलाईन हस्तांतरणाच्या अंतिम दिनांकापर्यंत उक्त तारांकित प्रश्नाच्या ऑनलाईन हस्तांतरणाची QIS या वेब ॲप संगणकीय प्रणालीद्वारे कार्यवाही पूर्ण करावी व प्रश्नाच्या हस्तांतरणाच्या पत्राची एक प्रत विधानपरिषद प्रश्न ("ई-१") कक्षास अग्रेषित करुन कक्षाच्या e1.qust.mls@gmail.com या ई-मेलवर देखील पाठविण्याची सर्व मंत्रालयीन विभागांनी दक्षता घ्यावी.

(जान्हवी गमरे)
कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

(१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
(२) मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
(३) सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
(४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित.

महाराष्ट्र विधानपरिषद

तृतीय (हिवाळी) अधिवेशन, २०२६

तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक, विभागाकडून उत्तर येण्याचा अंतिम दिनांक तसेच प्रश्नाच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा अंतिम दिनांक इत्यादीबाबतची माहिती दर्शविणारे विवरणपत्र

गट क्र. (१)	गटामध्ये समाविष्ट असलेले मा.मंत्री (२)	प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३)	विभागाकडून उत्तर येण्याचा अंतिम वार व दिनांक (४)	प्रश्नाच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा अंतिम वार व दिनांक (५)
एक	(१) वैद्यकीय शिक्षण मंत्री (२) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री (३) मृद व जलसंधारण मंत्री (४) उद्योग, गुंतवणुक, सेवा व मराठी भाषा मंत्री (५) महिला व बालविकास मंत्री (६) ग्रामविकास मंत्री (७) कामगार मंत्री (८) सार्वजनिक आरोग्य मंत्री	सोमवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२६ सोमवार, दिनांक १४ डिसेंबर,२०२६ *सोमवार, दिनांक २१ डिसेंबर,२०२६	सोमवार, दिनांक ३० नोव्हेंबर, २०२६ सोमवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२६ सोमवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२६	बुधवार, दिनांक २५ नोव्हेंबर, २०२६ बुधवार, दिनांक ०२ डिसेंबर, २०२६ बुधवार, दिनांक ०९ डिसेंबर, २०२६
दोन	(१) महसूल मंत्री (२) वने मंत्री (३) आदिवासी विकास मंत्री (४) कृषी मंत्री (५) सामाजिक न्याय मंत्री (६) रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री (७) मदत व पुनर्वसन मंत्री (८) मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री	मंगळवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२६ मंगळवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२६ * मंगळवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२६	मंगळवार, दिनांक १ डिसेंबर, २०२६ मंगळवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२६ मंगळवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२६	गुरुवार, दिनांक २६ नोव्हेंबर, २०२६ बुधवार, दिनांक ०२ डिसेंबर, २०२६ बुधवार, दिनांक ०९ डिसेंबर, २०२६

गट क्र. (१)	गटामध्ये समाविष्ट असलेले मा.मंत्री (२)	प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३)	विभागाकडून उत्तर येण्याचा अंतिम वार व दिनांक (४)	प्रश्नाच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा अंतिम वार व दिनांक (५)
तीन	(१) मुख्यमंत्री (२) पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री (३) इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धव्यवसाय विकास,अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री (४) पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री (५) इलेक्ट्रॉनिक्स,माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता, सांस्कृतिक कार्य मंत्री (६) परिवहन मंत्री	बुधवार, दिनांक ०९ डिसेंबर, २०२६ बुधवार, दिनांक १६ डिसेंबर, २०२६ *बुधवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२६	बुधवार, दिनांक ०२ डिसेंबर, २०२६ बुधवार, दिनांक ०९ डिसेंबर, २०२६ मंगळवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२६	शुक्रवार, दिनांक २७ नोव्हेंबर,२०२६ शुक्रवार, दिनांक ०४ डिसेंबर,२०२६ गुरुवार, दिनांक १० डिसेंबर, २०२६
चार	(१) उपमुख्यमंत्री (२) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री (३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री (४) अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री	गुरुवार, दिनांक १० डिसेंबर, २०२६ गुरुवार, दिनांक १७ डिसेंबर, २०२६ *गुरुवार, दिनांक २४ डिसेंबर, २०२६	गुरुवार, दिनांक ०३ डिसेंबर, २०२६ गुरुवार, दिनांक १० डिसेंबर, २०२६ गुरुवार, दिनांक १७ डिसेंबर, २०२६	सोमवार, दिनांक ३० नोव्हेंबर,२०२६ सोमवार, दिनांक ०७ डिसेंबर,२०२६ सोमवार, दिनांक १४ डिसेंबर,२०२६
पाच	(१) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री (२) उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री (३) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री (४) शालेय शिक्षण मंत्री (५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री (६) पणन, राजशिष्टाचार मंत्री (७) वस्त्रोद्योग मंत्री (८) सहकार मंत्री	शुक्रवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२६ शुक्रवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२६	शुक्रवार, दिनांक ०४ डिसेंबर,२०२६ शुक्रवार, दिनांक ११ डिसेंबर,२०२६	मंगळवार, दिनांक ०१ डिसेंबर, २०२६ मंगळवार, दिनांक ०८ डिसेंबर, २०२६

* आगामी अधिवेशनाच्या सोमवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२६ ते शुक्रवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२६ या कालावधीत वाढ झाल्यास पूर्वखबरदारी म्हणून एक आठवडयाच्या जादा प्रश्न सूचना कार्यवाहीत घेण्यात येत आहेत.